Co-funded by
the European Union

SWISSAID

आय् एल् एस् विधी महाविद्यालय, पुणे आणि स्विसएड आयोजित प्रकल्प

निर्धार समानतेचा

अर्थसहाय्य - युरोपियन युनियन

महाराष्ट्र राज्याच्या मुलींसाठी कल्याणकारी योजना

लेखिका
डॉ. स्वाती कुलकर्णी
डॉ. शैला डावरे
जेफी जेकब

प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याच्या मुलींसाठी कल्याणकारी योजना ही पुस्तिका महिला व मुलींसाठी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली आहे. अनेक समस्यांचा सामना करणाऱ्या मुली / महिलांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक पाठबळ पुरवणे हा या योजनांचा उद्देश आहे.

आय्एल्एस् विधी महाविद्यालय आणि स्विसएड ही सामाजिक संस्था "निर्धार समानतेचा" हा प्रकल्प राबवीत आहे. त्यासाठी युरोपीयन युनियनकडून अर्थसहाय्य लाभले आहे. मराठवाड्यात होणारी लिंग आधारित असमानता आणि त्यावर आधारित हिंसा थांबवण्यासाठी या प्रकल्पाच्या माध्यमातून आम्ही काम करत आहोत.

केंद्र शासनातर्फे तसेच राज्य शासनातर्फे अनेक प्रकारच्या योजना तळागाळातील लोकांना मदत व्हावी, त्यांना सहाय्य मिळावे आणि त्यांचे सक्षमीकरण व्हावे या उद्देशाने राबवल्या जातात. परंतु अशा प्रकारच्या योजनांची माहिती अनेक वेळा लोकांपर्यंत पोहोचत नाही. अशा योजनांची आवश्यक माहिती जर लोकांपर्यंत पोहोचली तर लोकांना त्याचा लाभ घेणे सहज शक्य होईल आणि शासनाला देखील त्या योजना राबविणे सोपे होईल. या उद्देशाने आम्ही मुली आणि महिलांकरिता असलेल्या विविध योजनांची माहिती देणारी पुस्तिका तयार करण्याचे ठरवले. या पुस्तिकेमध्ये मुलींकरिता आणि महिलांकरिता लागू करण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती दिली गेली आहे. या पुस्तिकेत प्रमुख शासकीय योजनांची माहिती, पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे, लाभ आणि अर्ज प्रक्रिया या सर्व बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. मुलींना / महिलांना शिक्षण मिळाले, त्यांचे आरोग्य चांगले राहिले, त्यांना आर्थिक सहाय्य मिळाले तर आपोआपच त्यांचे सक्षमीकरण होण्यास मदत होऊ शकते.

या पुस्तिकेचे प्रकाशन आम्ही violencenomore.in या संकेतस्थळावर करत आहोत. सर्व गरजू महिला व मुलींना या पुस्तिकेतील माहिती वाचता येईल आणि लाभ घेता येईल. तसेच, सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांसाठी ही पुस्तिका उपयुक्त ठरेल अशी आम्हाला खात्री आहे. या पुस्तिकेचा वापर करून जास्तीत जास्त मुली व महिलांनी शासनाच्या योजनांची लाभ घ्यावा.

महाराष्ट्र राज्याच्या मुलींसाठी कल्याणकारी योजना

For the project titled "**Addressing Gender-Based Violence and Discrimination, Particularly Domestic Violence, and Child Marriage in the Marathwada Region of the State of Maharashtra, India**" undertaken by ILS Law College, Pune in collaboration with SWISSAID and co-funded by the European Union.

लेखिका - डॉ. स्वाती कुलकर्णी

डॉ. शैला डावरे

जेफी जेकब

१. बेटी बचाओ... बेटी पढाओ योजना

केंद्र शासनाने बेटी बचाओ, बेटी पढाओ (बी बी बी पी) ही योजना ज्या जिल्ह्यांमध्ये मुलींचा जन्मदर कमी आहे, अशा १०० जिल्ह्यांसाठी सुरु केली. सुरुवातीला यामध्ये महाराष्ट्रातील बीड, जळगाव, अहिल्यानगर, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, वाशीम, कोल्हापूर, धाराशिव, सांगली, जालना या जिल्ह्यांचा समावेश होता. त्यानंतर ही योजना हिंगोली, परभणी, पुणे, नाशिक, लातूर व सोलापूर या जिल्ह्यांमध्येही लागू करण्यात आली.

बेटी बचाओ, बेटी पढाओ हे अभियान यशस्वीपणे राबवता यावे म्हणून सुकन्या समृद्धी योजना तयार करण्यात आली. मुलींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे व त्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.
बेटी बचाओ, बेटी पढाओ या योजनेचा लाभ घेण्यासाठी बँकेत अगर पोस्टात मुलीच्या नावाने सुकन्या समृद्धी खाते उघडावे लागते.

या योजनेचा लाभ कोणाला घेता येईल?

- ज्या कुटुंबात १० वर्षांपेक्षा कमी वय असलेली मुलगी असेल;
- कोणत्याही भारतीय बँकेत, पोस्टात अगर एच डी एफ सी बँक, आय सी आय सी आय बँक किंवा ॲक्सीस बँक येथे अशा मुलीच्या नावाने सुकन्या समृद्धी अकाउंट (एस एस ए) असे खाते उघडावे लागेल.
- अशी मुलगी निवासी भारतीय नागरिक या वर्गातीलच असली पाहिजे.
- अनिवासी भारतीय या योजनेसाठी अपात्र आहेत.

या योजनेचा लाभ मिळावा याकरता काय करावे लागेल?

त्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज करावा लागेल.

- पोस्ट ऑफिस किंवा बँक, जेथे ही योजना सहजगत्या उपलब्ध असेल, त्या ठिकाणी हा अर्ज भरावा.
- बीबीबीपी/एस एस ए अर्ज भरून त्याला आवश्यक ती कागदपत्रे जोडावीत.
- मुलीच्या नावाने खाते उघडण्या साठी हा भरलेला अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित अधिकाऱ्यांकडे द्यावा.

आवश्यक कागदपत्रे

- अधिकृत सरकारी संस्था किंवा इस्पितळ यांच्याकडून घेतलेला मुलीचा जन्माचा दाखला
- आईवडिलांची ओळखपत्रे, यांत रेशनकार्ड व आधारकार्ड असणे गरजेचे.
- रहिवासाचा (पत्त्याचा) पुरावा, जसे की वीजबील, फोनबिल, ड्राईव्हिंग लायसन्स, पासपोर्ट इ.
- पासपोर्ट साईझ फोटो.

या योजनेची उद्दिष्टे:-

१) मुलींना शिक्षण व प्रगतीच्या इतर संधी उपलब्ध करून देणे व त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळेल अशी व्यव्यस्था करणे.

२) मुलींचा जन्मदर वाढवणे.

३) मुलगी व मुलगा यांच्यातील भेदभाव नष्ट करणे.

४) प्रसूतीपूर्व लिंग चाचणी करून मुलीच्या गर्भाची हत्या करण्याची प्रवृत्ती संपवणे.

2. माझी कन्या भाग्यश्री योजना

माझी कन्या भाग्यश्री ही महाराष्ट्र शासनाने आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या कुटुंबातील मुलींसाठी तयार केलेली योजना आहे. या योजनेनुसार मुलींना रु. ५०,०००/- पर्यंत आर्थिक सहाय्य मिळते.

या योजनेचा लाभ कोणाला व कसा मिळतो?

अ.क्र.	लाभ मिळण्यास पात्र लाभार्थी	शासनाकडून बँकेत गुंतवण्यात येणारी रक्कम	मुलीच्या वयाच्या टप्प्यानुसार द्यावयाची रक्कम (व्याज धरून)
१	एका मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतलेली माता किंवा पिता. अशी शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) जमा केल्यानंतरच शासनाकडून मुलीच्या नावे पैसे गुंतवले जातील.	मुलीच्या नावे रु. ५०,०००/- एवढी रक्कम बँकेत मुदत ठेव योजनेत गुंतवण्यात येईल.	१) रु. ५०,०००/- च्या मुदत ठेवीवरील ६ वर्षांचे व्याज मुलीच्या ६ व्या वर्षी मिळेल. २) रु. ५०,०००/-मुदत ठेवीवरील पुढील ६ वर्षांचे व्याज मुलीच्या वयाच्या १२ व्या वर्षी मिळेल. ३) मुदत ठेव मुद्दल रु. ५०,०००/- पुढील सहा वर्षांनंतर जमा झालेल्या व्याजासह

			मुलीला तिच्या वयाच्या १८ व्या वर्षी काढता येईल.
२	दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतलेली माता किंवा पिता. अशी शस्त्रक्रिया केल्याचे प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) जमा केल्यानंतरच शासनाकडून मुलीच्या नावे पैसे गुंतवले जातील.	पहिल्या व दुसऱ्या मुलीच्या नावे प्रत्येकी रु. २५,००० म्हणजे एकूण रु. ५०,०००/- एवढी रक्कम बँकेत मुदत ठेव योजनेत गुंतवण्यात येईल	१) रु. २५,०००/- च्या च्या मुदत ठेवीवरील ६ वर्षांचे व्याज मुलीच्या ६ व्या वर्षी मिळेल. २) रु. २५,०००/- मुदत ठेवीवरील पुढील ६ वर्षांचे व्याज मुलीच्या वयाच्या १२ व्या वर्षी मिळेल. ३) मुदत ठेव मुद्दल रु. २५,०००/- पुढील ६ वर्षांच्या व्याजासह मुलीला तिच्या वयाच्या १८ व्या वर्षी काढता येईल.

पात्रता:

१. महाराष्ट्र राज्याचे कायमस्वरूपी निवासी.

२. मुलीचा/मुलींचा जन्म १ ऑगस्ट २०२३ नंतर झालेला असावा.

३. वार्षिक उत्पन्न रु. ७.५ लाखापर्यंत असावे.

४. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे सर्टिफिकेट जमा करणे आवश्यक.

अर्जासोबत जोडायची कागदपत्रे:

१. आधार कार्ड

२. बँक खात्याची माहिती

३. पत्त्याचा पुरावा

४. उत्पन्नाचा दाखला

५ पासपोर्ट साईज फोटो.

अर्ज कसा करावा? :

१. या योजनेस पात्र असलेल्या व्यक्तीने जवळच्या अंगणवाडी केंद्रात जाऊन अंगणवाडी सेविकेकडून अर्ज घेऊन त्यात आवश्यक ती माहिती भरून तो पूर्ण करावा.

२. वर सांगितलेली सर्व कागदपत्रे अर्जाला जोडावीत.

३. अर्ज दाखल केल्यावर संबंधित अधिकाऱ्याकडून अर्जाची तपासणी होईल. सर्व कागदपत्रे व अर्जातील माहिती पडताळून पाहिल्यानंतर ती खरी व योग्य असल्यास अर्जाला मान्यता देण्यात येईल.

४. अर्जाला मान्यता मिळाल्यास अनुदानाची रक्कम मुलीच्या नवे मुदत ठेव योजनेत ठेवली जाईल.

३. सी बी एस ई उडान योजना

भारतीय समाजात मुलीच्या जन्माबाबत सकारात्मक विचार वाढवणे, मुलींना शैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनविणे, अभियांत्रिकी शिक्षणात मुलींचे प्रमाण वाढविणे, त्यांना तंत्र शिक्षण व अभियांत्रिकी शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणे

याकरिता ही योजना सुरु झाली. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ आणि भारत सरकारचे मनुष्यबळ आणि विकास मंत्रालय यांनी मिळून ही योजना सुरु केली.

लाभार्थी - इयत्ता ११ वी व १२ वी त शिकणाऱ्या विद्यार्थिनी.

पात्रता:

१. अर्जदार विद्यार्थिनीने भारतीय नागरिक असणे आवश्यक.

२. अर्जदार विद्यार्थिनीने तिचे ११ वी चे शिक्षण केंदीय विद्यालयाची कोणतीही शाखा, अथवा नवोदय शाळा, अथवा संबंधित राज्याच्या सरकार द्वारे मान्यताप्राप्त सरकारी शाळा, अथवा सीबीएसइ शी संलग्न असलेल्या भारतातील कोणत्याही खाजगी शाळेत घेतले असले पाहिजे.

३. अर्जदार मुलीने ११ वी मध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या विषयांसह विज्ञान शाखेची निवड केली असली पाहिजे.

४. अर्जदार मुलीला इयत्ता १० वी मध्ये किमान ७० % गुण व विज्ञान आणि गणित या विषयांमध्ये ८० % गुण असणे आवश्यक आहे. जर तिचे शिक्षण सीजीपीए पद्धतीने गुण देणाऱ्या शाळेत झाले असेल तर किमान सीजीपीए ८ व विज्ञान विषयांसाठी जीपीए स्कोअर ९ असणे आवश्यक आहे.

अर्ज कसा करावा?

१. सीबीएसई उडान योजनेच्या अधिकृत वेबसाईट ला भेट द्या.) उडान ऑनलाईन पोर्टल वर रजिस्ट्रेशन करा.

२. अर्ज करण्याच्या सूचना व इतर माहिती काळजीपूर्वक वाचा.

३. अर्ज अचूक माहितीसह भरा.

४. अर्ज सबमिट केल्यावर रजिस्ट्रेशन नंबर स्क्रीनवर दिसतो. तो इमेल द्वारे अर्जदाराला पाठवला जातो. याकरता अर्जदाराने आपला इमेल पत्ता अचूकपणे भरणे आवश्यक आहे.

५. जन्मतारीख व रजिस्ट्रेशन नंबर दिलेल्या स्लॉटमध्ये टाकून छायाचित्र अपलोड करावे.

६. अर्ज डाऊनलोड करून त्याची प्रिंट घेऊन ठेवावी.

(https://www.cbse.gov.in/cbsenew/cbse.html

आवश्यक कागदपत्रे

१. विद्यार्थीनीचे आधार कार्ड

२. पत्त्याचा पुरावा

३. अर्जदाराच्या पालकांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला.

४. कोर्ससाठी फी भरल्याची पावती

५. दहावी च्या परीक्षेचे गुण पत्रक.

६. अर्जदाराचे जात प्रमाणपत्र

७. बँक पासबुक व बँक खात्याची माहिती

संपर्क तपशील :

सीबीएसई मदतीसाठी इ मेल- – udasn.cbse@gmail.com

सीबीएसई मदतीसाठी फोन नंबर-– 011-23214737, 011-23231820, 011-23220083

४. सबला योजना (किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण)

ही योजना वय वर्षे ११ ते १८ या वयोगटातील मुलींकरता आहे. किशोरवयीन मुलींचा विकास व सक्षमीकरण करणे, त्यांच्या पोषणाचा व आरोग्याचा दर्जा सुधारणे, त्यांच्यात स्वच्छता, पोषण, लैंगिक आरोग्य, प्रजनन, कुटुंब व बालकांची काळजी याविषयी जागरूकता निर्माण करणे त्यांचे घरातील कौशल्य, जीवन कौशल्य विकास करणे, शिक्षण सोडलेल्या किशोरी/मुलींना औपचारिक/अनौपचारिक शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. प्राथमिक आरोग्य केंद्र, सामुदायिक आरोग्य केंद्र, पोस्ट,बँक,पोलिस स्टेशन इ. सार्वजनिक सेवांच्या बाबतीत सूचना आणि मार्गदर्शन करणे, ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत.

छायाचित्र स्त्रोत- https://www.mcpanchkula.org/rajiv-gandhi-scheme-for-empowerment.aspx

ही योजना राज्यात बीड, नांदेड, मुंबई, नाशिक, गडचिरोली, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर आणि गोंदिया या जिल्हयात राबविली जात आहे.

या योजनेंतर्गत आंगणवाडी केंद्रावरती १५ ते २५ वयोगटातील मुलींचा समूहगट बनवून त्यांना खालील सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

- पोषक आहार
- लोह व फॉलिक ॲसिड गोळया
- नियमित आरोग्य तपासणी

- पोषण आणि आरोग्य विषयक शिक्षण
- कुटुंब कल्याण, प्रजनन, बाल संगोपन विषयक मार्गदर्शन
- जीवन कौशल्य शिक्षण आणि सार्वजनिक सेवा
- व्यावसायिक प्रशिक्षण

देशातील दारिद्र्यरेषेखालील सर्व किशोरवयीन मुलींना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. अंगणवाडी सेविका गावातील घरांचे सर्वेक्षण करून या योजनेचा लाभ देण्यासाठी किशोरवयीन मुलींची निवड करतील. निवड झालेल्या किशोरवयीन मुलींना जवळच्या अंगणवाडीत प्रशिक्षण देण्यात येईल. त्यांची वेळोवेळी तपासणी करून त्याची नोंद ठेवण्यात येईल.

५. लेक लाडकी योजना

या योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबातील मुलींना त्यांच्या जन्मापासून त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत आर्थिक सहाय्य करणे.

या योजनेअंतर्गत राज्यातील आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबातील मुलींना त्यांच्या जन्मापासून तिचे वय १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत तिच्या शिक्षणासाठी एकूण ९८,०००/- रुपयांचे आर्थिक सहाय्य ५टप्प्यात करण्यात येते जे तिच्या वयानुसार आणि शिक्षणानुसार वेगवेगळी असेल. लेक लाडकी योजना मुख्य करून मुलींसाठी सुरु करण्यात आलेली एक महत्वाकांक्षी अशी योजना आहे ज्यामुळे आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबात जन्मलेल्या मुली स्वतःचे शिक्षण पूर्ण करून त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास करू शकतील.

लेक माझी लाडकी योजना अंतर्गत दिले जाणारे आर्थिक सहाय्य

टप्पा		**रक्कम**
पहिला	मुलीच्या जन्मानंतर	५,०००/- रुपये
दुसरा	मुलगी इयत्ता १ ली मध्ये गेल्यावर	६,०००/- रुपये
तिसरा	मुलगी ६ वी मध्ये गेल्यावर	७,०००/- रुपये
चौथा	मुलगी ११ वी मध्ये गेल्यावर	८,०००/- रुपये
पाचवा	मुलगी १८ वर्षाची झाल्यावर	७५,०००/- रुपये
	एकूण लाभ	**१,०१०००/- रुपये**

लेक लाडकी योजना पात्रता व अटी

- अर्जदार मुलीचे कुटुंब महाराष्ट्र राज्यातील मूळ रहिवाशी असणे आवश्यक आहे.
- फक्त पिवळे आणि केशरी रेशनकार्ड असलेली कुटुंबे लेक लाडकी योजनेचा लाभ मिळवू शकतात.
- आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबे या योजनेचा लाभ मिळवू शकतात.
- अर्जदार मुलीने केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर योजनेअंतर्गत शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य घेतलेले असता कामा नये.
- लेक लाडकी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी मुलीला स्वतःचे शिक्षण पूर्ण करणे गरजेचे आहे त्यामुळे जर मुलीने एखाद्या कारणास्तव शिक्षण सोडले तर अशा परिस्थितीत तिला लाभाची राशी दिली जाणार नाही.
- अर्जदाराच्या कुटुंबातील कोणी सदस्य सरकारी सेवेत कार्यरत असता कामा नये.

- ही योजना पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये दिनांक १ एप्रिल २०२३ रोजी वा त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन मुलींना लागू राहील. तसेच, एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील.
- पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी व दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करतेवेळी माता/पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
- दुसऱ्या प्रसूतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. मात्र त्यानंतर माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम १ लाखापेक्षा जास्त नसावे.

लेक लाडकी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

- मुलीचा जन्माचा दाखला
- कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न १ लाखपेक्षा जास्त नसावे.) याबाबत तहसिलदार / सक्षम अधिकारी यांचा दाखला आवश्यक राहील.
- अर्जदार मुलीचे आधार कार्ड (प्रथम लाभावेळी ही अट शिथील राहील)
- पालकाचे आधार कार्ड
- बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत
- रेशनकार्ड (पिवळे अथवा केशरी रेशन कार्ड साक्षांकित प्रत)
- पासपोर्ट साईज फोटो
- मतदान ओळखपत्र (शेवटच्या लाभाकरिता १८ वर्ष पूर्ण झाल्यांनतर मुलीचे मतदार यादीत नाव असल्याचा दाखला)
- संबधित टप्प्यावरील लाभाकरिता शिक्षण घेत असल्याबाबतचा संबंधित शाळेचा दाखला (Bonafide)
- कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाणपत्र

- अंतिम लाभाकरिता मुलगी अविवाहित असणे आवश्यक राहील, (अविवाहीत असल्याबाबत लाभार्थीचे स्वयं घोषणापत्र)
- मोबाईल नंबर

या योजनेचा लाभ कसा घ्यावा?

१. सदर योजनेसाठी आवश्यक असलेले सर्व अर्ज, राज्यातील प्रत्येक ग्रामीण व नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, विभागीय उपायुक्त महिला बाल विकास यांच्या कार्यालयात उपलब्ध असतील. अंगणवाडी सेविका संबंधित लाभार्थ्यांकडून अर्ज भरुन घेतील. गरजेप्रमाणे लाभार्थ्यांस अर्ज भरण्यास मदत केली जाईल आणि सदर अर्ज अंगणवाडी पर्यवेक्षिका / मुख्यसेविका यांच्याकडे सादर करावा.

६. मनोधैर्य योजना

बलात्कार आणि ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला व बालके यांच्या पुनर्वसनसाठी आर्थिक सहाय्य पुरविणे या साठी महाराष्ट्र शासन कडून मनोधैर्य योजना राबविण्यात येत आहे

बलात्कार आणि हल्ला पिडीतांना (महिला आणि बालक) झालेल्या मानसिक आघातातून सावरणे सर्वात महत्वाचे असते. त्याच बरोबरीने त्यांना निवारा, आर्थिक मदत, वैद्यकीय आणि कायदेशीर मदत तसेच समुपदेशन सेवा उपलब्ध करून देणेही महत्वाचे असते.

हे लक्षात घेऊनच राज्यातील महिला आणि बाल विकास विभाग मनोधैर्य योजनेची अमंलबजावणी करीत आहे. याद्वारे पिडीतांना १ लाख रुपयांची आणि विशेष प्रकरणांमध्ये १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येते. पिडीतांचे आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक असा निवारा, समुपदेशन, वैद्यकीय आणि कायदेशीर मदत, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

सिंगल विंडो सिस्टिम : या योजनेंतर्गत अर्ज स्वीकारण्यापासून ते आर्थिक सहाय्य पुरविणे याबाबतची सर्व प्रक्रिया राज्य/ जिल्हा विधिक सेवा प्राधिकरण याना हस्तांतरण करण्यात आली आहे

<u>मनोधैर्य योजनेत अर्थसहाय्य कसे मिळवावे?</u>

- घटनेसंदर्भातील एफआयआर ची प्रत व अन्य कागदपत्रे संबंधित पोलीस तपासणी अधिकारी ई- मेलद्वारे अथवा अन्य माध्यमातून एक (०१) तासाच्या आत संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण तसेच संबंधित जिल्हा महिला विकास अधिकारी यांच्याकडे पाठवतील.
- तद्नंतर संबंधीत पीडित महिलेस वैद्यकीय व मानसिक आधार देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या One Stop Centre मार्फत त्यांना तात्काळ सेवा पुरविण्यात येतील.
- सदर One Stop Centre केंद्रांनी पीडितांस नजीकच्या शासकीय/निमशासकीय किंवा खाजगी रुग्णालयाच्या माध्यमातून तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यवाही करावी.
- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडे कागदपत्रे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत पीडितास 30 हजार इतकी रक्कम पीडिताच्या वैद्यकीय उपचारासाठी तात्काळ मदत म्हणून मंजूर करण्यात येईल.
- तदनंतर प्रकरणाची सखोल तपासणी करुन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण 120 दिवसाच्या आत उर्वरित अर्थसहाय्याची रक्कम संबंधित पीडितास मंजुर करेल.

- पीडितांस मंजुर करण्यात आलेल्या एकूण रक्कमेपैकी 25% इतक्या रक्कमेधून 30000 वैद्यकीय उपचारासाठी रोखीने अदा करण्यात येतील व उर्वरित रक्कमेचा धनादेश खालीलप्रमाणे अदा करण्ययात यावा.
- पिडीतेच्या बँक खात्यात, पिडीतेचा मृत्यू झाल्यास वारसाच्या बँक खात्यात रक्कम जमा होईल.
- उर्वरित 75% रक्कम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधीसेवा प्राधिकरण यांच्यामार्फत खालीलप्रमाणे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल च याबाबतच्या पावतीची प्रत सात दिवसाच्या आत संबंधीतास उपलब्ध करुन देण्यात येईल.
- सदर योजनेअंतर्गत पीडितास मंजूर करावयाच्या अर्थसहाय्याच्या रक्कमेसाठी तीच्या स्वत:च्या नावे KYC norms असलेले बैंक खाते उघडणे बंधनकारक आहे.
- पीडित व्यक्ती अज्ञान असेल तर त्याच्या बाबतीत पालकत्व स्वीकारणाऱ्या व्यक्तीच्या नावे बैंक खाते उघडण्यात यावे.